# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या पंचेचाळीसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.३० ऑक्टोबर, २०१२ दुपारी १:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची पंचेचाळीसावी सभा मंगळवार, दि.३० ऑक्टोबर, २०१२ रोजी दुपारी १:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन., संचालक म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ५) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ७) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ८) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| ११) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १२) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १३) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक तथा प्रभारी वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १४) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी., कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

प्रा. डॉ. पाटील टी. आर., विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग, सोलापूर (मा.शिक्षण संचालक पुणे यांचे प्रतिनिधी), प्र. सहसंचालक, (तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी), श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील व प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांनी व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस अनुपस्थित राहणार असल्याचे दूरध्वनीद्वारे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.१६ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या चव्वेचाळीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव : दि.१६ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या चव्वेचाळीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव :** **मा.कुलगुरु यांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] आठव्या दीक्षांत समारंभात मार्च / एप्रिल २०१२ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व ऑक्टोबर २०१२ अखेर विद्यावाचस्पती पदवी संपादित केलेल्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणीः प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा विद्यार्थ्यांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, विद्यावाचस्पती पदवी प्रदान करणे याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९६(१) मधील तरतूद खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **कलम ९६(१)** | **"व्यवस्थापन परिषदेस, विद्यापरिषदेकडून शिफारस करण्यात येतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी सुरु आणि प्रदान करता येतील."** |

वरील तरतूद विचारात घेता मार्च / एप्रिल २०१२ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व ऑक्टोबर, २०१२ अखेर विद्यावाचस्पती पदवी संपादित केलेल्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम ९६(१) अन्वये दि.१८/१०/२०१२ रोजीच्या विद्यापरिषदेसमोर विषय क्र.७० नुसार ठेवली असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला आहे

| | |
|---|---|
| **ठरावः** | **"ही विद्यापरिषद व्यवस्थापन परिषदेस अशी शिफारस करते की, पात्र स्नातकांना पदव्या / पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्यास अनुमती द्यावी. "** |

**ठराव : आठव्या दीक्षांत समारंभात मार्च / एप्रिल २०१२ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व ऑक्टोबर २०१२ अखेर विद्यावाचस्पती पदवी संपादित केलेल्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] श्री. विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगांव (टें.) या संस्थेचे संचलित कर्मयोगी बबनरावजी शिंदे महाविद्यालय, कुर्डूवाडी ता.माढा हे महाविद्यालय शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

**(टिपणी:- मा. सचिव, श्री. विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगांव (टें) यांचेकडून खालीलप्रमाणे संचलित महाविद्यालय बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.**

| संस्थेचे नांव | जे महाविद्यालय बंद करावयाचे आहे त्या महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | महाविद्यालयात सुरु असलेले अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री. विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगांव (टें). ता.माढा, जि.सोलापूर. | कर्मयोगी बबनरावजी शिंदे महाविद्यालय, कुर्डूवाडी. ता.माढा, जि.सोलापूर | शै.वर्ष २०११-१२ पासून | बी.एस्सी. | कायम विनाअनुदानित |

उपरोक्तप्रमाणे संस्थेकडून संचलित महाविद्यालय बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात खालील समिती सदस्यांची स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

**१. प्राचार्य, एस.के. पवार (अध्यक्ष)**
**२. प्रा.डॉ. महादेव देशमुख (सदस्य)**
**३. प्रा.डॉ. जयश्री शिंदे (सदस्य)**

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला होता. सदर अहवालात समितीने उपरोक्त महाविद्यालय शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याची शिफारस केलेली होती.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये उपरोक्त संस्थेचे संचलित, कर्मयोगी बबनरावजी शिंदे महाविद्यालय, कुर्डूवाडी. हे महाविद्यालय शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याची बाब दि.१८/१०/२०१२ रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत विचारार्थ ठेवली असता विद्यापरिषदेने ठराव क्र.७९ अन्वये सदर महाविद्यालय शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

**सबब श्री. विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगांव (टें) या संस्थेचे संचलित कर्मयोगी बबनरावजी शिंदे महाविद्यालय, कुर्डूवाडी हे महाविद्यालय शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).**

**ठराव: श्री. विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगांव (टें.) या संस्थेचे संचलित कर्मयोगी बबनरावजी शिंदे महाविद्यालय, कुर्डूवाडी ता.माढा हे महाविद्यालय शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन शासनास शिफारस करण्यात आली.**

**[ ०५ ] भारत महाविद्यालय, जेऊर (म.रेल्वे) ता.करमाळा या महाविद्यालयातील बी. कॉम. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१२-१३ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

**(टिपणी:- मा.सचिव, भारत शिक्षण प्रसारक मंडळ, जेऊर (म.रेल्वे) ता.करमाळा यांचेकडून खालीलप्रमाणे संचलित महाविद्यालयातील अभ्यासक्रम बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.**

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | शै.वर्ष २०१२-१३ पासून बंद करावयाचे पाठ्यक्रम |
|---|---|---|
| **भारत शिक्षण प्रसारक मंडळ, जेऊर (म.रेल्वे) ता.करमाळा, जि.सोलापूर.** | **भारत महाविद्यालय, जेऊर (म.रेल्वे) ता.करमाळा, जि.सोलापूर.** | **बी.कॉम.** |

उपरोक्तप्रमाणे संलग्नित महाविद्यालयातील बी.कॉम. अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात खालील समिती सदस्यांची स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

**१. प्रा.डॉ. ए.बी. सुर्यवंशी (अध्यक्ष)**
**२. प्रा.डॉ. ए.ए. शेख (सदस्य)**
**३. प्रा.डॉ. एस.के. पाटील (सदस्य)**

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला होता. सदर समितीने सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून वाणिज्य विद्याशाखा बंद करण्याची शिफारस केलेली होती.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये भारत महाविद्यालय, जेऊर(म.रेल्वे) या महाविद्यालयातील बी.कॉम. अभ्यासक्रम बंद करण्याची बाब दि.१८/१०/२०१२ रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत विचारार्थ ठेवली असता. विद्यापरिषदेने ठराव क्र.२४ अन्वये उपरोक्त अभ्यासक्रम शै.वर्ष २०१२-१३ पासून बंद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

**सबब भारत महाविद्यालय, जेऊर(म.रेल्वे) या महाविद्यालयातील बी. कॉम हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१२-१३ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).**

**ठराव: भारत महाविद्यालय, जेऊर (म.रेल्वे) ता.करमाळा या महाविद्यालयातील बी. कॉम. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१२-१३ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन शासनास शिफारस करण्यात आली.**

**[ ०६ ] कॉलेज ऑफ फार्मसी, गोपाळपूर, ता.पंढरपूर या महाविद्यालयातील एम. फार्मसी. (फार्माकोग्नसी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस विचारार्थ.**

**(टिपणी:-** मा.सचिव, श्री.विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिट्युट, पंढरपूर संचलित कॉलेज ऑफ फार्मसी, गोपाळपूर, ता.पंढरपूर या महाविद्यालयातील खालील अभ्यासक्रम बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

| संस्था व महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचा अभ्यासक्रम | बंद करावयाचे वर्ष |
|---|---|---|
| श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिट्युट, पंढरपूर संचलित, कॉलेज ऑफ फार्मसी, गोपाळपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर | एम. फार्मसी. (फार्माकोग्नसी) | शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून |

सदर महाविद्यालयातील एम.फार्मसी. (फार्माकोग्नसी) हा अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या पस्तावासंदर्भात आवश्यक ती चौकशी करुन त्यावर सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये दि.३०/०७/२०१२ रोजीच्या विद्यापरिषदेने खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त केली होती.

**१. प्राचार्य आर. वाय. पाटील (अध्यक्ष)**

**२. प्रा. डॉ. एम. एस. कलशेट्टी (सदस्य)**

**३. प्रा. के. एच. रुद्रमणी (सदस्य)**

उपरोक्त समितीने महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने एम.फार्मसी. (फार्माकोग्नसी) हा अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे. या संदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये एम.फार्मसी. (फार्माकोग्नसी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने ठराव क्र.८९, दि.१८/१०/२०१२ अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

**सबब, कॉलेज ऑफ फार्मसी, गोपाळपूर, ता.पंढरपूर या महाविद्यालयातील एम.फार्मसी. (फार्माकोग्नसी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस विचारार्थ).**

**ठराव: कॉलेज ऑफ फार्मसी, गोपाळपूर, ता. पंढरपूर या महाविद्यालयातील एम. फार्मसी. (फार्माकोग्नसी) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन शासनास शिफारस करण्यात आली.**

**[ ०७ ] विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी परिषद स्थापन करण्याच्या तारखेबाबत मा कुलगुरूंनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणीः वद्यार्थी परिषद स्थापन करण्यासाठी तारीख निश्चित करण्याबाबत विद्यापीठ अधिनियम क्रंमाक S.446 खालीलपंमाणे आहे.

(The Principal shall finalize the nomination of the student members and other namely, one lecturer on the basis of his/her interest and experience in the students welfare activities, one Sr. Division NCC Officer, one NSS Programme Officer, and the Director of Sports and Physical Education, if any, on the Students' Council as per the provision in Section 40 (2) (b) and declare the Students' Council, duly formed on a date fixed by the Management Council.)

सदरची तारीख महाविद्यालयांना त्वरीत कळविणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४ (७) नूसार मा.कुलगुरू महोदय यांनी दि.२९/०८/२०१२ या तारखेस विद्यार्थी मंडळ स्थापनेची घोषणा व ०५/०९/२०१२ रोजी सचिव पदाची निवडणुक घेण्यासाठी तारखांना व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.मा.कुलगुरु महोदय यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव सादर).

**ठरावः मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०८ ] दि.१९/१०/२०१२ रोजी झालेल्या बांधकाम समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी: बांधकाम समितीची सभा दि.१९/१०/२०१२ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदर समितीच्या कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे. परिनियम अ.339 (f) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 339 (f) | After the meeting, the minutes shall be drawn by the Member Secretary who shall get them approved from the Chairman. The recommendations of the Building and Works Committee shall be placed before the Management Council for its approval. |

त्यानुसार दि.१९/१०/२०१२ रोजीच्या बांधकाम समितीच्या कार्यवृत्तांतातील ठराव क्र.२ ते ६, ९(१) व ९(२) विचारार्थ).

**ठराव: दि.१९/१०/२०१२ रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या कार्यवृत्तांतातील ठराव क्र.२ ते ६, ९(१) व ९ (२) यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] संलग्नित महाविद्यालयाकडील विद्यापीठविहित निवड समिती मार्फत निवड झालेल्या व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालयातून दुसऱ्या महाविद्यालयात बदली होऊन व पदनामात बदल झालेले प्रस्ताव, सोबतच्या तक्त्यातील शिक्षकांचे चेंजिंग इन स्टाफच्या समितीने केलेल्या शिफारशी दंडक ६५ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: संलग्नित महाविद्यालयाकडील शिक्षकांना चेंजिग इन स्टाफ मान्यता देण्यासाठी दंडक ५९ प्रमाणे गठीत केलेल्या समितीच्या बैठका दि.१३/०९/२०१२ व १४/०९/२०१२ रोजी प्रस्तुत विद्यापीठात पार पडल्या सदर बैठक सोबत जोडलेल्या तक्त्यात शिक्षकांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे चेजिंग इन स्टाफच्या मान्यतेच्या शिफारशी केलेल्या आहेत. सदरील शिफारशींना दंडक ६५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. यास्तव चेजिंग इन स्टाफ समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: संलग्नित महाविद्यालयाकडील विद्यापीठविहित निवड समिती मार्फत निवड झालेल्या व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालयातून दुसऱ्या महाविद्यालयात बदली होऊन व पदनामात बदल झालेल्या प्रस्तावाबाबत शिक्षकाच्या चेंजिग इन स्टाफच्या समितीने केलेल्या शिफारशी दंडक ६५ अन्वये स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या सभेत देण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: अधिसभा सदस्यांनी दि.२० नोव्हेंबर, २०१२ रोजी होणाऱ्या सभेकरीता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. परिनियम ४७६ (८) नुसार सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या सभेत व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी द्यावयाची आहेत.

सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ व सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या सभेत देण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशनास्तव विचारार्थ).

**ठराव: सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे दुरुस्त करण्यात आली व अधिसभेमध्ये त्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

## अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर व्यवस्थापन परिषदेने तयार केलेली उत्तरे

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **डॉ. भोसले यु. व्ही.** | | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| | १ | सोलापूर विद्यापीठाच्या अधिविभागामध्ये नवीन अनुदानित विभाग सुरु करण्याचा विचार आहे काय ? | होय. |
| | २ | सोलापूर विद्यापीठाच्या 2F आणि 12B च्या बाबतीत सदयस्थिती काय आहे ? | ● UGC letter No. F 9-17/2004 (CPP-I) dt. 21 March, 2005 अन्वये विद्यापीठास 2F मान्यता आहे.<br>दि. 28 April, 2010 च्या पत्रान्वये 12B साठी UGC कडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्यानंतरही विविध पत्रान्वये दि. १२ ऑक्टो, २०१२ पर्यंत पत्रव्यवहार झालेला आहे. |
| ● | **डॉ. बाड डी. आर.** | | **प्राचार्य डॉ. भांजे बी. एम.** |
| | ३ | विद्यापीठ परिक्षेच्या तारखा जाहीर झाल्यानंतर परिक्षा फॉर्म वेबसाईटवर उशिरा उपलब्ध होतात त्यामूळे विद्यार्थ्यांना मुदतीत फॉर्म भरण्यासाठी कमी कालावधी मिळून धावपळ होते. फॉर्म उशिरा उपलब्ध होण्याचे कारण काय ? | विद्यापीठ परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्यानंतर परीक्षा फॉर्म वेबसाईटवर वेळेत उपलब्ध असतात. |
| | | ● फॉर्म वेळेत उपलब्ध होण्यासाठी काय उपाययोजना केलेली आहे काय ? | सुधारीत प्रक्रिया राबवीत आहे. |
| | ४ | महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांचे परिक्षा फॉर्म भरुन विद्यापीठात जमा केल्यानंतर ते तपासून घेण्याची जबाबदारी कोणाची ? | परिक्षा विभागाची आहे. |
| | | ● परिक्षा फॉर्म तपासण्यासाठी विद्यापीठाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग आहे काय ? | आहे. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | | **डॉ. बारबोले ए. एन.** | **प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| | ५ | पीएच् डी प्रवेशपूर्व परीक्षा (PET) पास झाल्यानंतर DRC समितीपुढे ज्यांना बोलावले जाते त्यांची मुलाखत त्याला संशोधन आराखडा (synopsis) आणायला सांगुन त्यावर घेवून गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्याला डावलता येईल काय? | विभागीय संशोधन समितीसमोर संशोधन आराखडा (Synopsis) आणावयास सांगितले जात नाही. त्यामुळे, त्या आधारावर डावलले जात नाही. |
| | | ● शास्त्र विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना मुलाखतीला येताना संशोधन आराखडा (synopsis) आणावा, त्यावर मुलाखत घेतली जाईल हे कोणत्या नियमानुसार सांगितले जाते ? | शास्त्र विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना मुलाखतीला येताना संशोधन आराखडा (synopsis) आणण्यास सांगितले जात नाही. त्यामुळे त्या संदर्भातील नियम असणाचा प्रश्न उदभवत नाही. |
| | | ● 'मुलाखतीवर आधारीत प्रवेश', नियमांत नसतांना त्यांना प्रवेशाच्या हक्कापासून वंचित ठेवले जाते काय ? | विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम - २००९ नियमावली नुसार मुलाखती घेवूतच विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक निश्चिती करणेचा नियम आहे. |
| | ६ | एम्. फिल. पेपर तपासणी परीक्षा झाल्यापासून किती दिवसात (नियमानुसार) पूर्ण करणे सक्तीचे आहे? | एम. फिल. पेपर तपासणी परीक्षा झाल्यापासून कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ४५ दिवसात पूर्ण करण्याची महाराष्ट्र विद्यापीठ कायदयामध्ये तरतुद आहे. |
| | | ● वाणिज्य शाखेअंतर्गत एम्. फिल. परीक्षेची पेपर तपासणी किती दिवसात (परीक्षा झाल्यापासून) पूर्ण झाली ? | प्रश्न संदिग्ध आहे. |
| | | ● निर्धारीत वेळेते पेपर तपासणी करुन घेण्याची कायदेशीर (नियमानुसार) जबाबदारी कोणाची ? | विद्यापीठाच्या परीक्षा विभागाची. |
| | ७ | **प्रा. श्रीमती विभूते एस. बी.**<br>पी. एच्. डी. साठीची प्रवेशपूर्व परीक्षेच्या (PET) प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका परीक्षा झालेपासून चार दिवसात विद्यापीठाच्या संकेत स्थळावर टाकण्याचा ठराव अधिसभेने केला होता. त्यानुसार आजपर्यंत | **डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर.**<br>परिक्षा मंडळाच्या बैठकीत अधिसभेने केलेल्या ठरावासंबंधी विचार करता सद्यस्थितीत विद्यापीठाकडे उपलब्ध असलेल्या सुविधा अपुऱ्या असल्याने सदर प्रक्रिया करणे विद्यापीठास अशक्य आहे असा ठराव झाला. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अंमलबजावणी झाली काय ? | |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | • संकेत स्थळावर प्रश्न व उत्तर पत्रिका कोणत्या तारखांना टाकण्यात आल्या?<br>• तशी सूचना (तरतूद) माहितीपत्रकांत नमूद केली आहे काय ? | प्रश्न उद्‌भवत नाही.<br>नाही. |
| | ८ | **डॉ. बारबोले ए. एन.**<br>पीएच् डी शोध प्रबंध (Final) दाखल करण्यापूर्वी स्पायरल बायडींग स्वरुपात प्रबंध दाखल करुन तज्ञ समितीमार्फत दोष, चूका अथवा दुरुस्त्या सूचविल्या जातात, त्या नेमक्या कोणते मुद्दे घेवून विचाराव्या ?<br>• RRC ने मंजूरी दिलेल्या संशोधन आराखड्यानुसार व मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केलेल्या शोध प्रबंधातील कथित दुरुस्त्या संशोधन आराखड्याला सोडून विचारण्याचा आधिकार त्या तज्ञ समितीला आहे काय ?<br>• सामाजिक शास्त्र विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यार्थ्यास त्याचे संशोधन कार्य दुय्यम स्त्रोतावर (Secondary Data) आधारीत असतांना व सदरच्या आराखड्यास RRC व संशोधन मार्गदर्शकाने मंजूरी देऊन संशोधनाचे काम पुर्ण झाल्यानंतर तज्ञ समितीने प्रथम स्त्रोतावर (Primary Data) काम करण्यास सांगणे नियमाला धरुन आहे काय ? | **प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही.**<br>Ph.D नियमावली Annexure I नुसार मुद्दे विचारात घेवून विचाराव्या.<br>नाही.<br>मान्य. संशोधन आराखड्याच्या चौकटीत राहून दुरुस्त्या सुचविता येतात. |
| | ९ | **डॉ. चव्हाण सी. एस.**<br>मागील सिनेट मध्ये परिक्षेचे आसन क्रमांक विद्यार्थ्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार असावे असे मंजूर करण्यात आले होते त्याची अंमलबजावणी झाली आहे काय? | **डॉ. सुर्यवंशी एस. एस.**<br>नाही. |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्रमांक</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td></td><td>१०</td><td>प्रत्येक महाविद्यालयाकडून प्राध्यापक व शिकवित असलेल्या पेपर क्रमांकाची माहिती विद्यापीठास महाविद्यालयाकडून वेळेत प्राप्त झाली आहे काय?</td><td>अंशतः प्राप्त झाली आहे.</td></tr>
<tr><td></td><td>११</td><td>PET परिक्षेच्या पहिल्या 'जनरल' पेपरचा अभ्यासक्रम काय आहे ?</td><td>पीएच. डी. नियमावली आर. पीएच. डी. ३ (ii) नुसार</td></tr>
<tr><td></td><td>● १२</td><td><u>डॉ. कोळेकर टी. एन.</u><br>सोलापूर विद्यापीठातील किती शिक्षक पदे रिक्त आहेत ?<br>● सदरची शिक्षक पदे भरण्यासाठी किती वेळा जाहिरात देण्यात आली आहे ?</td><td><u>सुर्यवंशी एस. एस.</u><br>०४ शिक्षक पदे<br>
<table>
<tr><th>संकुल</th><th>पद</th><th>जाहिरात</th></tr>
<tr><td>संगणकशास्त्र संकुल</td><td>प्राध्यापक (खुला)<br>पद - १</td><td>६ वेळा</td></tr>
<tr><td></td><td>सहयोगी प्राध्यापक<br>(अ.जा.)<br>पद - १</td><td>६ वेळा</td></tr>
<tr><td>पदार्थ विज्ञान संकुल</td><td>सहयोगी प्राध्यापक<br>(अ.जा.)<br>पद - १</td><td>५ वेळा</td></tr>
<tr><td></td><td>सहाय्यक प्राध्यापक<br>(अ.ज.)<br>पद - १</td><td>४ वेळा</td></tr>
</table></td></tr>
<tr><td></td><td>● १३</td><td><u>प्रा. श्रीमती विभूते एस. बी.</u><br>मंगळवार दिनांक १६/१०/२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठरावा प्रमाणे शासनाने पगार बंद केलेल्या त्या १२ (बारा) कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकले आहे काय ?<br>● सेवामुक्त केले नसल्यास त्याची कारणे कोणती आहेत ?</td><td>नावः ॲड. सलगर बी. एस.<br>नाही.<br><br>प्रश्नच उद्‌भवत नाही.</td></tr>
<tr><td></td><td>.१४</td><td>विद्यापीठात झालेल्या उपकुलसचिव व सहा. कुलसचिव या पदाच्या निवड समितीमध्ये व्यवस्थापन परिषदेमधील सदस्यातून त्यांनी सुचविलेले दोन प्रतिनिधी घेतले जातात. असे दोन प्रतिनिधी ज्या व्यवस्थापन परिषदेतून निवडले तो व्यवस्थापन परिषदेतील ठराव व दिनांक कोणती ?</td><td>सद्यस्थितीत ही पदे भरताना अशी कोणतीही तरतूद नाही.</td></tr>
<tr><td></td><td></td><td>● सदरचे दोन सदस्य मा.कुलगुरुंनी नियमबाह्यपणे आपल्या पदाचा गैरवापर करुन दिले होते काय?</td><td>प्रश्नच उद्‌भवत नाही.</td></tr>
</table>

**[ ११ ] दि.१९/१०/२०१२ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी: दि.१९/१०/२०१२ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statute No.S.324 नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता त्यास दि.२३/१०/२०१२ च्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

सबब, दि.१९/१०/२०१२ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: दि.१९/१०/२०१२ च्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस मान्य करुन मान्यता देण्यात आली.**

**मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :**

**[१२(१)] सोलापूर विद्यापीठामध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी (ETCS-2012) Abstract Printing, Confrence Pad, Lunch Coupons, Breakfast Coupons, Plastic Badges With ribbon, and Certificate छपाई करुन घेण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठामधील रसायनशास्त्र संकुलामध्ये आयोजित होणाऱ्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी (ETCS-2012) Abstract Printing, Confrence Pad, Lunch Coupons, Breakfast Coupons, Plastic Badges With ribbon, and Certificate छपाई करण्यासाठी जाहिर निविदा सुचना दि.०९/१०/२०१२ रोजी दैनिक सकाळ या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदे सुचनेनुसार भरलेली निविदा विद्यापीठात जमा करण्याचा अंतिम दि.१५/१०/२०१२ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यत होती.

अंतिम दिनांकास एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या. सदरच्या निविदा दोन लिफिफा पध्दतीने मागविण्यात आलेल्या होत्या. तांत्रिक निविदा खरेदी समितीने दि.१५/१०/२०१२ रोजी उघडया व सर्व कागदपत्रांची तपासणी करुन सर्व निविदा पात्र ठरविल्या.

तदनंतर दि.१५/१०/२०१२ रोजी खरेदी समिती सदस्यांसह व निविदा धारकांच्या उपस्थितीत मा. कुलगुरु यांचे कार्यालयात कर्मशियल बील (Commercial Bill) उघडून न्युनतम निविदा धारकाबरोबर वाटाघाटी करण्यात आल्या. त्यांचा तपशील सोबत जोडला आहे.

Abstract Printing, Confrence Pad, Lunch Coupons, Breakfast Coupons, Plastic Badges With ribbon, and Certificate हे खालीलप्रमाणे छपाई करणेस शिफारस करण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Abstract (Souvenir) Printing size 18 X 23¼ (demi A4) 150 Paper (300 pages), i) inside 90 GSM art paper four color printing (10 pages), ii) 80 GSM bll. Map-Black & White iii) Four color, with spot lamination (as per Speciman), Qty, 400. | Qty. | Rate |
| | | 400 | 225/- Per book |
| 2 | i) Conference pad (100 Pages, 6 X 8.5 inch) | 800 | 13600/- |
| | ii) Coupons Lunch, | 500 | 750/- |
| | iii) Coupons Break Fast, | 500 | 750/- |
| | iv) Plastic Badges with ribbon, | 500 | 7000/- |
| 3 | Certificate Pinting (as per specimen) | 500 | 2300/- |

दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार न्युनतम दर असलेले M/S Kalashri mudran & Screen 160A, Sonnalgi Shopping Centre, Shop No. 10, Sakhar Peth, Solapur या फर्मकडून वरील प्रमाणे एकूण किमंत रु१,१३,९००/- या किमंतीस छपाई करण्यास शिफारस करण्यात आली.

सबब, वरीलप्रमाणे छपाई करुन घेण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः सोलापूर विद्यापीठामध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी (ETCS-2012) Abstract Printing, Confrence Pad, Lunch Coupons, Breakfast Coupons, Plastic Badges With ribbon, and Certificate इत्यादी तुलनात्मक तक्त्यानुसार न्युनतम दर असलेले M/S Kalashri mudran & Screen, Solapur या फर्मकडून वरील प्रमाणेच्या खरेदीस मान्यता देण्यात आली.**

**[१२(२)] सोलापूर विद्यापीठामध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी (ETCS-2012) भोजन पुरवठा करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाकडे दि.२१ ते २४ जानेवारी, २०१२ या कालावधीत (ISCBC-2012) आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेच्या जेवणाच्या व्यवस्था करणेसाठी व्यवस्थापन परिषद सभा क्र.३९, विषय क्र.१९(४) दि.१२ जानेवारी, २०१२ रोजीच्या सभेमध्ये झालेल्या ठरावानुसार एक स्वतंत्र समिती नियुक्ती करण्यास व जेवणाचा दर्जा ठरविणे, दराबाबत चर्चा करण्याचे अधिकार समितीस देण्यास मान्यता दिलेली होती.

सदर समितीने मे. शिवनेरी हॉटेल ॲन्ड मेस, सोलापूर यांना खालील मेनू व दराप्रमाणे जेवणाचा पुरवठा करण्याची शिफारस करण्यात आली होती.

| अ. क्र. | मेनू | दर |
|---|---|---|
| १ | चहा व नाष्टा (चहा, दुध, कॉफी) (इडली वडा, सांबर, चटणी, पयनापल शिरा व इतर यापैकी) (Bread/Toast & Jam, Omlet only for Foreign delegates) | Rs.50/- per plate |
| २ | दुपारचे जेवन - शाकाहारी (शेंगापोळी, मटर फ्लॉवर, ग्रीन पीस, चपाती, वरण भात, शेंगा चटणी, बुंदी रायता, पालक पनीर, सॅलेड, जीरा राईस) | Rs.150/- per plate |
| ३ | दुपारचा चहा (चहा, कॉफी, बिस्किट २ ते ३ प्रकार) | Rs.22/- per plate |
| ४ | संध्याकाळचे जेवण | |
| | **शाकाहारी -** मेथी मलाई, मटर, पनीर बटर मसाला, दाल फ्राय, पुलाव राईस, दही, परोठा/भाकरी/नान+पंजाबी कुल्फी | Rs.150/- per plate + 20 for panjabi culfi |
| | **मांसाहारी -** मटन मसाला, चिकन मसाला, जिरा राईस, परोठा/भाकरी/नान, सॅलेड/पापड/लोणचे + पंजाबी कुल्फी | Rs.180/- per plate + 20 for panjabi culfi |

रसायनशास्त्र संकुलाकडे आंतरराष्ट्रीय परिषद (ETCS-2012) दि.२ ते ४ नोव्हेंबर, २०१२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या परिषदेला विद्यार्थी, विख्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ असे एकूण ४०० व्यक्ती अंदाजे उपस्थित राहणार आहेत. त्यासाठी रु.४ लाख खर्च अपेक्षित आहे. मे. शिवनेरी हॉटेल ॲन्ड मेस, सोलापूर यांनी मागील दराप्रमाणेच जेवणाचा पुरवठा करण्याबाबतचे पत्र दिलेले आहे. तरी समितीनेही मागीलवेळी पुरवठा केलेल्या जेवणाची गुणवत्ता, सेवा व दर यांचा विचार करता मे. शिवनेरी हॉटेल ॲन्ड मेस, सोलापूर यांना जेवणाचा पुरवठा करण्याबाबतची शिफारस केलेली आहे.

सबब, सदर समितीने शिफारशीनुसार आंतरराष्ट्रीय परिषद (ETCS-2012) दि.२ ते ४ नोव्हेंबर, २०१२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या परिषदेसाठी भोजन पुरवठा करणेची बाब विचारार्थ सादर).

**ठराव: सोलापूर विद्यापीठामध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी (ETCS-2012) मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांचेकडून (ISCBC-2012) या आंतरराष्ट्रीय परिषदेवेळी पुरवठा करण्यात आलेल्या दराप्रमाणेच भोजन पुरवठा घेण्यास मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |